मानव विकास कार्यक्रमांतर्गत “तालुक्याच्या ठिकाणी बालभवन - विज्ञान केन्द्र स्थापन करणे” या योजनेअंतर्गत बालभवन-विज्ञान केन्द्राच्या आवर्ती खर्चात व प्रोत्साहन रक्कमेत वाढ करुन देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र:- माविका-२०१७/प्र.क्र.१५/का.१४१८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक -: १२ जानेवारी, २०१८.

<u>वाचा -</u> १) नियोजन विभाग,शासन निर्णय, क्र माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८,दि.१९ जुलै,२०११.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र माविका-२०१२/प्र.क्र.६९/का.१४१८,दि.१२जुलै,२०१२.
३) आयुक्त,मानव विकास कार्यालय,औरंगाबाद पत्र क्र.१६/माविआ/शिक्षण/बालभवन/कावि-६८६, दि.३० डिसेंबर,२०१६.

**प्रस्तावना :-**

नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८,दि.१९ जुलै,२०११च्या शासन निर्णयान्वये राज्यातील निवडलेल्या २२ अतिमागास जिल्ह्यांतील १२५ तालुक्यांमध्ये मानव विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र माविका-२०१२/ प्र.क्र.६९/ का.१४१८, दि.१२जुलै,२०१२ अन्वये मानव विकास कार्यक्रम सन २०१२-१३ पासून निवडलेल्या १२५ तालुक्यातील “क” वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या शिक्षण विषयक योजनांतर्गत “तालुक्याच्या ठिकाणी बालभवन -विज्ञान केन्द्र स्थापन करणे” ही योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात एकच बालभवन -विज्ञान केन्द्र स्थापन करावयाचे आहे. त्यानुसार एकूण १२४ तालुक्याच्या ठिकाणी बालभवन-विज्ञान केंन्द्राची स्थापना करण्यात आलेली आहे. मानव विकास कार्यक्रमांतर्गत “तालुक्याच्या ठिकाणी बालभवन -विज्ञान केन्द्र स्थापन करणे” या योजनेंतर्गत बालभवन केंद्र चालविण्यासाठी प्रतीवर्ष प्रत्येक बालभवन -विज्ञान केंद्रास रु.१०,०००/- वार्षिक आवर्ती खर्च देण्यात येतो तसेच बालभवन -विज्ञान केंद्राना भेट देणा-या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.१०/- प्रति विद्यार्थी प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. आयुक्त मानव विकास यांनी संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये केलेल्या मागणीस अनुसरुन बालभवन-विज्ञान केंद्रासाठी देण्यात येणा-या रु.१०,०००/- वार्षिक आवर्ती खर्चात तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या रु.१०/- प्रोत्साहन भत्ता प्रति विद्यार्थी मर्यादा वाढविणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

१. मानव विकास कार्यक्रमांतर्गत, “तालुक्याच्या ठिकाणी बालभवन -विज्ञान केन्द्र स्थापन करणे” या योजनेअंतर्गत बालभवन केंद्र चालविण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये विहीत केलेली वार्षिक आवर्ती खर्चाची मर्यादा वाढवून आता ती प्रती बालभवन -विज्ञान केंद्र प्रती वर्ष रु.२५,०००/-आणि विद्यार्थ्यांना देण्यात येणारा प्रोत्साहन भत्ता प्रती विद्यार्थी रु.२५/-करण्याबाबत शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१८०११५१२२२३८४०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e658721c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.01.15 12:27:09 +05'30'

**( वि. फ. वसावे )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.मंत्री(वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव.
३. मा.राज्यमंत्री/मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५. मा.विरोधी पक्ष नेते,विधान सभा/विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
६. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
७. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०. शासनाचे मुख्य सचिव,
११. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव
१२. आयुक्त ,मानव विकास आयुक्तालय,बाबा पेट्रोलपंपजवळ,अदालत रोड, औरंगाबाद
१३. विभागीय आयुक्त , (संबधित)
१४. जिल्हाधिकारी , (संबधित)
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, (संबधित)
१६. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
१७. अधिदान व लेखा अधिकारी,महाराष्ट्र शासन
१८. उपायुक्त, नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय,(संबधित)
१९. जिल्हा नियोजन अधिकारी ,(संबधित)
२०. जिल्हा कोषागार अधिकारी (संबधित)
२१. नियोजन विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव
२२. निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग.